# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई-विरार यांचेकार्यालय

रामनगर,सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे

दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१ mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्र.- ३४ दिनांक २६/०२/२०२१

## नयानगर येथील ज्वेलर्स दुकाणावर भरदिवसा अग्नीशस्त्रांचा धाक दाखवुन टाकलेल्या दरोडयाचे गुन्हयातील आरोपींना अटक करुन आरोपीं विरुध्द मोक्का कायद्यान्वये कारवाई.

दिनांक ०७/०१/२०२१ रोजी दुपारी ०२:०० वाजताचे सुमारास शांतीनगर, मिरारोड पुर्व, येथील एस. कुमार गोल्ड ॲण्ड डायमंड शॉपवर ०५ अनोळखी आरोपीतांनी सोने खरेदी करण्याचे बहाण्याने दुकानात येवुन फिर्यादी त्यांना सोन्याचे दागीणे दाखवत असताना आरोपींनी त्यांचेकडील पिस्टलचा धाक दाखवुन एकुण १,५४,२९,७२२/- रुपये किंमतीचे सोन्याचे-डायमंडचे दागीने दरोडा टाकुन जबरीने चोरुन नेले. सदर बाबत नयानगर पोलीस ठाण्यात गु.र.नं. १४/२०२१,भा.दं.वि.सं.कलम ३९४,३९५,३४ सह भारतीय हत्यार कायदा अधिनियम ३,२५ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

गंभीर स्वरुपाचा गुन्हा असल्याने गुन्हयाचा तपास तात्काळ गुन्हे शाखा युनीट-१ मिरारोड यांचेकडे वर्ग करण्यात आला. वपोनि/जितेंद्र वनकोटी, गुन्हे शाखा युनीट-१ मिरारोड यांनी पोनि/प्रमोद बडाख व गुन्हे शाखेचे पथकाचे मदतीने सदर गुन्हयाचा कौशल्यपुर्ण तांत्रीक तपास करुण, अथक परिश्रम घेवुन गुन्हयातील आरोपी निष्पन्न करुन आरोपींचा माग काढुन प्रथम ०३ आरोपीत १) दिनेश कलव निशाद, २) शैलेंद्र उर्फ बबलु मुरारी, ३) विनयकुमार उर्फ सिंटु चंद्रहास सिंह, तिन्ही मुळ रा. उत्तर प्रदेश यांना उत्तर प्रदेश येथुन अटक करुन आरोपीतांकडूण ५५२ ग्रॅम सोन्याचे दागीणे किंमत ३१,०००००/-रुपये, रोख रक्कम १४,१९,०००/- रुपये, ०१ रिवाल्वर (अग्निशस्त्र), ३७ जिवंत काडतुस, एक देशी बनावटीचा कट्टा (अग्निशस्त्र), १ जिवंत काडतुस हस्तगत करण्यात आले. पाहिजे आरोपी ४) सोनु महिपाल सिंग, रा. उत्तर प्रदेश यास जुन्या गुन्हयात अटक होवुन तो गाजीपूर कारागृहात असल्याची माहिती प्राप्त झाल्याने त्यास कारागृहातुन ताब्यात घेण्यात आले असुन, पाहिजे आरोपी ५) संजित रामसुख सिंह, रा. अग्रवाल नगरी नालासोपारा यास मुंबई येथुन ताब्यात घेवुन गुन्हयात अटक करण्यात आली असुन आरोपींची दिनांक ०८/०३/२०२१ रोजी पर्यंत पोलीस कोठडी मंजुर आहे. अटक आरोपी हे सराईत असुन आरोपी क्र. १ विरुध्द ०६, आरोपी क्र. २ विरुध्द ०७, आरोपी क्र. ०३ विरुध्द ११, आरोपी क्र. ४ विरुध्द ०१, आरोपी क्र. ५ विरुध्द ०२ गुन्हयांची नयानगर पो.स्टे. व उत्तरप्रदेश येथील पोलीस ठाण्यांमध्ये नोंद असुन आरोपींविरुध्द **महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ चे कलम** ३ (१) (ii), ३ (२) & ३ (४) अन्वये कारवाई करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास श्री. शशिकांत भोसले, सहाय्यक पोलीस आयुक्त, नवघर विभाग हे करीत आहेत.

सदरची कामगीरी मा. पोलीस आयुक्त, अपर पोलीस आयुक्त, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि/जितेंद्र वनकोटी, गुन्हे शाखा युनीट-१ मिरारोड, पोनि/प्रमोद बडाख, गुन्हे शाखा युनीट-३ विरार, गुन्हे शाखेचे सपोनि/विलास कुटे, पोउपनि/हितेंद्र विचारे, पोउपनि/शिनोळकर पो.हवा./१०६७ राजेश तांबे, पो.हवा./२३७६ अर्जुन जाधव, पो.ना./१८५० संजय शिंदे, पोना/३०८ पुष्पेंद्र थापा, पो.ना/१६४४ सचिन सावंत, पोहवा/२७०७ अशोक पाटील, पो.ना./१६२३ मनोज चव्हाण, पो.ना. मनोज सपकाळ, पोहवा/१४९ जनार्दन मते, पोना/१६१० शिवाजी पाटील, पोना/१२१८ गोवींद केंद्रे, पोशि/३३७५ राजेश श्रिवास्तव यांनी केली आहे.

--------ooo-------